कवी कैलास सलादे यांच्या 'दाहगाथा' या काव्यसंग्रहाचे परीक्षण

# शेतकऱ्यांच्या वेदनेची दाहगाथा-

पुस्तक परीक्षण- पाटील अनंत दिगंबर (एम.ए.मराठी)

कवी कैलास सलादे यांचा सन २०१५ मध्ये 'दाहगाथा' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे.श्रीरामपूर येथील शब्दालय या प्रकाशन संस्थेने हा संग्रह प्रकाशित केला आहे.या संग्रहामध्ये एकूण ६० कविता आहे.यातील सर्व कविता शेती-मातीच्या वेदना मांडणाऱ्या आहे.शेतकरी. शेतकऱ्याचे दु:ख, त्याच्या वेदना हलाकीचे जगणे, नापिकी, दुष्काळ, बाजारभावाचा प्रश्न, सरकार दरबारी होणारे शोषण अशा अस्मानी आणि सुलतानी संकट परंपरांनी पिचून निघालेल्या कुणब्याच्या दुखाची अनेक प्रश्न वाचकासमोर ठेवते.या संग्रहाची भलावण करताना मुखपृष्ठावर कवी इंद्रजित भालेराव लिहितात 'क्रुसाला टांगल्या जाणाऱ्या येशूसारखा बोरीबाभळींना टांगला जाणारा डोळ्यात अंधार घेऊन पांगत जाणारा कुणबी हाच या कवितेचा गाभाघटक आहे हे सगळं भयाण वास्तव कवितेच्या पातळीवर नेऊन स्वतःच्या अस्सल भाषेत मांडल्यामुळे ही कविता आतला गहिवर घेऊन आलेली आहे. काळजाला पीळ पाडणारी दु:खाची परिभाषा आणि मातीच्या उगवण शक्तीवरची दुर्दम्य आशा या कवितेत पाहायला मिळते. म्हणूनच ही कुणब्याच्या वर्तमानाची श्रेष्ठ कविता आहे. मातीला जपण्यासाठी आयुष्य पेरणारा हा कवी डोईजड झालेलं दु:ख कविता करून हलकं करतो. शतकानुशतकं पडिक पडलेल्या इतिहासाची नांगराच्या बोरूनं नांगरट करणारा हा कवी येणाऱ्या भयानक काळावर मात करण्यासाठी नवा नायक घडवू पाहात आहे. वर्तमानालाच न कळणारी वर्तमानाची लिपी उलगडून दाखवायचं अवघड काम कवीनं या कवितेत केलेलं आहे. त्यामुळेच शिलालेखात वानगीदाखलही पाहायला न मिळणारी कुणब्याची आदिम वेदना इथे शिल्पीत झालेली पाहायला मिळते. याची जाणीव काव्यसंग्रह वाचल्यानंतर आपल्याला झाल्याशिवाय राहत नाही.

ऐसे हे कुणबी वर्तमान, उसावल्या जगण्याला, दुखावर माती लोटताना, पिकासारखं पोरींना, वारी, पाऊस, कोंडी, माझ्याकडे उरलं काय, दुष्काळाचे ढोर, भोग, लोकशाही, पोरी, सांगावा, येता पेरणीचे दिस, तरी पण, सरत चाललाय पाणकळा, विस्थापित, हिंमटा, नांगरट यासारख्या कवितेतून कवीच्या लेखन कौशल्याची ओळख पटते. अल्पाक्षरी रचनेतून मोठा आशय सांगण्याचा कवीचा प्रयत्न दिसतो.

*अस्मानी सुल्तानी*
*संकटांचे हल्ले,*
*स्वप्नांचे किल्ले उद्वस्त*
*असे नियतीचे*
*पांगळेच डाव*
*घावावर घाव सोसवेना*
*येती वांझ ओघ*
*उसण्या दयेचे*
*कोरड्या मायेचे ओहळाना*

या कवितेत अस्मानी सुलतानी संकटात पिचल्या गेलेल्या शेतकऱ्याचे दु:ख आणि सरकारी पातळीवरून येणारे उसने दयेचे आणि मायेचे ओघ कवीला अस्वस्थ करतात.

*इथली पोरं सोरं*
*लहानाची मोठी होतात...*
*मरणाची ओझी*
*वाहता वाहता*
*ढेकळासारखी मातीआड*
*गाडली जातात....*

*त्यांच्या गाडल्या जाण्याचा*
*कुठल्याच राजवटीत*
*इतिहास लिहिला जात नाही*
*आतड्याला पीळ देत मरणं*
*देशासाठी बलिदान होत नाही.*

या कवितेत कवीने शेतकऱ्याच्या जगण्याचा इतिहास कोणत्याच राजवटीत लिहिला जात नाही.त्यांची दाखल घेतली जात नाही.याविषयी आपले मत मांडले आहे.


वारी नावाच्या कवितेत पंढरपुराची वारी करता न आलेल्या एका शेतकऱ्याची खंत आणि कैफियत मांडली आहे.कवी म्हणतो

*नाही केली पंढरीची*
*तुका कधी मी रे वारी*
*काय सांगू बाबा तुला*
*माझा मातीमध्ये हरी*

आयुष्याच मातीत पुरून घेतल्याने वारी करता न आलेल्या शेतकऱ्याचे दु:ख कवी यात मांडतो.पुढे तो असे म्हणतो की,

*केली दुबार पेरणी*
*दाह निमूट सोसला*
*तळ हाताच्या फोडात*
*तेव्हा विठ्ठल दिसला*

तळ हाताच्या फोडात विठ्ठल बघणे ही कृती श्रम संस्कृतीचा गौरव करणारी गोष्ट आहे.शेतकरी आपल्या शेतातच पंढरपूर, विठ्ठल शोधात असो.ही गोष्ट अस्सल शेतकऱ्याच्या प्रामाणिक कष्टांचा गौरव केलेला आहे.




काव्य संग्रहाचे नाव- दाहगाथा

कवी- कैलास सलादे

प्रकाशन- शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

आवृत्ती- ऑगस्ट २०१५

मूल्य- १२० रु.

Prof. (Dr.) Y. M. Salunke